ISSN 2454-3292

International Registered and Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

# INDO WESTERN RESEARCH JOURNAL

(UGC Approved, Refereed & Peer Reviewed Research Journal)

Year - V, Issue-IX, Vol.- II
Impact Factor 5.50
(GRIFI)
(Sept. 2018 To Feb. 2019)

EDITOR IN CHIEF
DR. Sudhir Agale

Scanned by CamScanner

Issue : IX, Vol. II
IWRJ
IMPACT FACTOR 5.50
ISSN 2454-3292
Sept. 2018 To Feb. 2019

# INDEX


| Sr. No | Title for Research Paper | Page No. |
| --- | --- | --- |
| 1 | E-Way Bill in Goods Services Tax<br>**Dr. Balasaheb D. Chatte** | 1 |
| 2 | A Study on, "The impact of policy making on Vocational Education in changing Economic Scenario"<br>**Bhagyashree J Deshpande, Dr Shubhangee L Diwe** | 5 |
| 3 | National Innovation System : Key Elements and Prospective<br>**Dr. Suryakant Ratan Chaugule** | 11 |
| 4 | Comparative Study Save Taxes And Create Wealth With Ppf And Elss Funds (Mutual Funds)<br>**Dr. Manju R. Mutha** | 17 |
| 5 | Human Resource Management Practices and Impact with special reference to Bank Employee<br>**Satya Kishan** | 21 |
| 6 | Rural Marketing<br>**Baburao Rambhau Munde** | 25 |
| 7 | Goods and service tax (GST) opportunities and challenges<br>**Vaishali Ashok Lahane** | 29 |
| 8 | Impact of Social Media on bank dealings in Jalna / Aurangabad Region<br>**Dr. Sudhir V. Agale** | 34 |
| 9 | Teachers' Perception towards Patanjali Products<br>**Dr. S. M. Sarsare** | 38 |
| 10 | Recent Trends in E-Banking<br>**Dr. P. G. Kalam** | 43 |
| 11 | आखुरालेली कोरडवाहु शेती आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या<br>**डॉ. शिवप्रसाद डोंगरे** | 47 |
| 12 | भारतातील पायाभूत संरचना आणि कृषि, औद्योगिक विकास<br>**श्रीमंत तुकाराम कावळे** | 51 |
| 13 | जागतिकीकरणाचा कृषीक्षेत्रावरील परिणाम: एक दृष्टीक्षेप<br>**प्रशांत बबुवान क्षीरसागर, काळम प्रमोद गंगाधर** | 57 |
| 14 | महाराष्ट्रातील वाढत्या शेतकरी आत्महत्यांचा अभ्यास - विशेष संदर्भात विदर्भ विभाग<br>**अमोल पांडुरंग गायकवाड** | 62 |
| 15 | आर्थिक विकासातील कृषीक्षेत्राची भुमिका<br>**बी. एस. जोगदंड** | 66 |
| 16 | वस्तू व सेवा कराचे भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम<br>**डॉ. विश्वनाथ कोक्कर** | 70 |


Scanned by CamScanner

Indo Western Research Journal (IWRJ) (66)

IMPACT FACTOR 5.40

ISSN 2454-3292

Indo Western Research Journal (IWRJ)
Issue : IX, Vol. : II
Sept. 2018 To Feb. 2019

www.irasg.com

**Research Paper** **15** **Economics**

# आर्थिक विकासातील कृषीक्षेत्राची भुमिका

**बी. एस. जोगदंड**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
आर.बी.अट्टल महाविद्यालय,
गेवराई जि.बीड

**प्रस्तावना :**

देशाची अर्थव्यवस्था कोणत्याही प्रकारची असो त्या अर्थव्यवस्थेच्या/देशाच्या आर्थिक विकासामध्ये ज्या प्रमाणे औद्योगिक व सेवाक्षेत्राचे योगदान महत्त्वाचे आहे त्याच प्रमाणे कृषी क्षेत्राच्या योगदानाकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. कृषी क्षेत्राचे हे योगदान केवळ आजच्या आधुनिक काळातच नव्हे तर मानवी उत्क्रांतीच्या काळापासूनच अनन्यसाधारण असे आहे. कृषी क्षेत्राने केवळ उपजिविकेचे साधनच नव्हे तर आर्थिक विकासातील महत्त्वाचा घटक म्हणून आपले महत्त्व अधोरेखीत केले आहे. जगातील सर्वच देशामध्ये विकसित देश असो की, विकसनशील देश किंवा अविकसित देश असो या सर्व देशांमध्ये कृषी क्षेत्राचे आर्थिक विकासामध्ये बहुमूल्य योगदान स्पष्ट दिसते, हे पुढील प्रमाणे विशद करता येईल.

**१.राष्ट्रीय उत्पादनातील वाटा :**

भारताच्या राष्ट्रीय उत्पादनातील कृषीचा वाटा महत्त्वाचा आहे. १९५०-५१ साली. GDP मध्ये कृषी क्षेत्राचे योगदान ५१.८१% एवढे होते. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर कृषी क्षेत्रात अनेक चढ- उतार आलेले दिसून येतात. सन २०१६-१७ साली GDP मधील वाटा १७.१% एवढा राहिला.

मागील काही वर्षांमध्ये कृषी क्षेत्राचा GDP मधील वाटा पुढील प्रमाणे होता. सन २०१०-११ मध्ये १८.२%, २०११-१२ साली १७.८६%, २०१२-१३ साली १७.५२%, २०१३-१४ साली १८.२०%, २०१४-१५ साली १७.१९% एवढा होता.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर आर्थिक विकासाबरोबरच कृषीचा GDP मधील वाटा कमी होत असलेला दिसून येतो. याचे कारण म्हणजे देशातील औद्योगिकरणाची प्रगती व सेवाक्षेत्राचा होणारा विस्तार असे सांगता येईल असे असले तरी GDP मधील कृषिक्षेत्राचे महत्त्व कमी होत नाही.

**२. रोजगार निर्मिती :**

कृषी क्षेत्राचे महत्त्व रोजगार निर्मितीच्या दृष्टीने ही अनन्य साधारण आहे. कृषी क्षेत्र हे कुशल



Scanned by CamScanner

- अकुशल अशा सर्व प्रकारच्या श्रमिकांना रोजगाराची संधी निर्माण करण्यास सक्षम आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार भारतातील एकूण लोकसंख्येच्या ६१.५% लोकसंख्या कृषी क्षेत्रावर अवलंबून होती.

सन २०००-०१ साली हे प्रमाण ६२.१% एवढे होते. कृषी क्षेत्रामध्ये रोजगाराच्या मोठ्या प्रमाणावर संधी निर्माण होण्याची काही कारणे पुढील प्रमाणे सांगता येतील. एक म्हणजे रोजगाराचे असंख्य पर्याय उपलब्ध आहेत. म्हणजेच प्रत्यक्ष शेती करण्यापासून ते शेतीला मदत करणारे, पुरक असे व्यवसाय करता येतात. ज्या माध्यमातून रोजगार उपलब्ध होतो. यासाठी कोणत्याही प्रकारे शेतीची पार्श्वभूमी असण्याची आवश्यकता नसते. शेतीमध्ये रोजगार शोधणाऱ्यांसाठी जमेची बाजू म्हणजे या क्षेत्रातून रोजगाराचा मोबदलाही चांगला मिळतो यासाठी कोणतेही प्रशस्त कार्यालय चालू करण्याची आवश्यकता नसते. कृषीक्षेत्र हे पारंपारिक न राहता प्रगतीशील क्षेत्र बनले आहे. त्यामुळे नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यासाठी मोठ्या संधी येथे उपलब्ध होतात. या क्षेत्रात रोजगार शोधणे म्हणजे शेतीत शारिरीक श्रम किंवा मजुरी करणे ही संकल्पना बदलत आहे. कृषी पुरक व्यवसाय सुरु केल्याने उद्योजक होण्याची संधी निर्माण होत आहे.

भारतातील कृषी क्षेत्र हे रोजगार निमार्ण करणारे सर्वात मोठे क्षेत्र आहे. सन १९९१ साली एकुण लोकसंख्येच्या ६३.५९ % एवढी लोकसंख्या या क्षेत्रात कार्यरत होती. तर २०११ साली प्रमाण ४८.८% एवढे होते. आणि २०१२ साली ४७.००%, २०१३ साली ४६.६६%, २०१४ साली ४५.५२%, २०१५ साली ४४.३६%, २०१६ साली ४३.४४% तसेच २०१७ साली भारतातील एकूण ४२.७४% एवढी लोकसंख्या कृषी क्षेत्रामध्ये कार्यरत होती.

**३) विदेश व्यापारातील महत्व :**

फार पुर्वी पासूनच भारतीय कृषी उत्पादनांचा व्यापार हा इतर देशांसोबत होत आहे. भारतातील मसाल्याचे पदार्थ यांना विदेशामध्ये मोठ्या प्रमाणावर मागणी असलेली दिसते. त्यासोबतच भारतातून हापुस आंबा, बासमती तांदुळ, द्राक्षे, केशर आंबा आदी अनेक पदार्थांची निर्यात केली जाते. जागतीक स्तरावर कृषी उत्पादनाची निर्यात करणाऱ्या देशांचा विचार केला असता असे दिसून येते की भारताचे स्थान ही निर्यातक देशांमध्ये महत्वाचे आहे.जगामध्ये सर्वाधीक जास्त कृषी उत्पादनांची निर्यात करणाऱ्या पहिल्या दहा देशामध्ये भारताचे स्थान आहे. सन २०१६ मध्ये जे सर्वाधीक निर्यातक देश होते त्यामध्ये युरोपियन संघ सर्वोच्च स्थानी होता.२०१६ मध्ये एकुण निर्याती मध्ये युरोपियन संघाचा वाटा ३८% एवढा होता. तर अर्जेंटिना हा देश सातव्या स्थानी, थायलंड आठव्या स्थानी, ऑस्ट्रेलिया दहाव्या स्थानी आणि भारत हा नवव्या स्थानी होता.

**भारतातून निर्यात होणारी कृषी उत्पादनाचे प्रमाण खालील तक्त्यावरून स्पष्ट करता येईल :**

| वर्ष | कृषी निर्यात (%एकुण निर्यातीच्या) | | वर्ष | कृषी निर्यात (%एकुण निर्यातीच्या) |
|---|---|---|---|---|
| २००१-०२ | १३.५ | | २००८-०९ | ९.५ |
| २००२-०३ | १२.८ | | २००९-१० | १०.० |
| २००३-०४ | ११.८ | | २०१०-११ | ९.९ |
| २००४-०५ | १०.१ | | २०११-१२ | १५.१९ |
| २००५-०६ | ९.९ | | २०१२-१३ | १४.१० |
| २००६-०७ | १०.३ | | २०१३-१४ | १३.७९ |
| २००७-०८ | ११.३ | | २०१४-१५ | १२.६६ |



Scanned by CamScanner

Source : Shabana Anjum and Arifa khan schanging pattern in indias Agricultural Exports under WTO -Economic Affairs vol-६२. No.०२-June २०१७

वरील आकडेवारी वरून लक्षात येते की एकुण निर्यातीमध्ये कृषी क्षेत्राचा सहभाग मोठा आहे.सन २००१-०२ मध्ये एकुण निर्यातीमध्ये १३.५% एवढा हिस्सा होता. तो २०१२-२०१३ साली १५.११% एवढा होता. त्यानंतर कमी होऊन २०१४-१५ साली १२.६६% एवढा होता. २०१७ च्या आकडेवारीनुसार भारताची कृषी संबंधीत उत्पादनाच्या निर्यातीचे मुल्य ३३.८७ कोटी डॉलर एवढे होते.

**४) विदेशी चलनाची प्राप्ती :-**

कृषी क्षेत्राचे महत्व केवळ लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्यापुरतेच नाही तर,कृषी क्षेत्र आपल्याला आवश्यक असणारे परदेशी चलन ही मिळवून देते. विदेशामध्ये भारतातील तयार होणाऱ्या वस्तुंना जसे की, कलाकुसरीच्या वस्तु, हस्तकलेच्या वस्तु, खेळणी यांना मागणी आहे, त्याचप्रमाणे कृषी क्षेत्रातील उत्पादनांनाही चांगली मागणी विदेशातून होत असते. या मागणीमूळेच आपल्याला विदेशी चलन मिळण्यास मदत होते.

कृषीक्षेत्रातून होणाऱ्या निर्यातीचे मुल्य पुढील तक्त्यात दर्शवले आहे.

| अ.क्र. | वर्ष | कृषी व संबंधीत निर्यातमूल्य (million US $) | वर्ष | कृषी.संबंधीत निर्यातीचे मुल्य (million US $) |
|---|---|---|---|---|
| १. | २००१-०२ | ५९०१ | २००८-०९ | १७५३४ |
| २. | २००२-०३ | ६७१० | २००९-१० | १७७३५ |
| ३. | २००३-०४ | ७५३३ | २०१०-११ | २४६९६ |
| ४. | २००४-०५ | ८७७५ | २०११-१२ | ३७४२० |
| ५. | २००५-०६ | १०२१४ | २०१२-१३ | ४२३५६.५० |
| ६. | २००६-०७ | १२६८३ | २०१३-१४ | ४३३५७-९२ |
| ७ | २००७-०८ | १८४३२ | २०१४-१५ | ३९२९०.५६ |

Source : Shabana Anjum and Arifa khan - changing pattern in indias Agricultural Exports under WTO-Economic Affairs vol-६२. No.०२-June २०१७

**५) अन्नाची उपलब्धता :-**

आर्थिक विकासातील महत्वाचे कृषीचे योगदान म्हणजे अर्थव्यवस्थेतील लोकसंख्येला अन्नाचा पुरवठा करणे होय. मानवाला पूर्ण कार्यक्षमतेने कार्य करण्यासाठी पोषक अन्नाची आवश्यकता असते. ही आवश्यकता पूर्ण करण्याचे काम कृषी क्षेत्र करत असते. स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये भारतामध्ये अन्न- धान्याची उपलब्धता पुरेशा प्रमाणात नव्हती. हि गरज पूर्ण करण्यासाठी इतर देशांवर अवलंबून रहावे लागत त्यामुळे मोठ्या प्रमाणावर अन्न-धान्याच्या आयातीवर देशाला खर्च करावा लागत असे. परंतु नंतरच्या काळात १९७०च्या दशकामध्ये भारतात झालेली हरीत क्रांतीने भारत स्वयंपूर्णच झाला. आजच्या घडीला देशामध्ये अन्न धान्याचे विक्रमी उत्पादन घेतले जाते.अन्न-धान्याची मोठ्या प्रमाणावरील गरज देशांतर्गत भागवली जाते. त्यामूळे आयातीवरील खर्चाची ही बचत होत आहे.



Scanned by CamScanner

६) ग्रामीण लोकसंख्येच्या कल्याणामध्ये वाढ :-

बदलत्या काळानुसार कृषी करण्याची पध्दती ही बदलली आहे.आणि या बदलत्या पध्दतीने ग्रामीण लोकांचे जीवनमान बदलण्यात त्यांच्या कल्याणामध्ये वाढ होण्यास मदत केली आहे. आज पर्यंत शेती केवळ निर्वाहाचे साधन राहिलेले नाही तर व्यापारी दृष्टीकोनातून कृषी क्षेत्राकडे पाहिले जात आहे. हा बदललेला दृष्टीकोन शेतकऱ्यांच्या कल्याणामध्ये ही बदल घडवत आहे. शेतीतील व्यापारी दृष्टीकोनामुळे नफ्याचा विचार केला जात आहे. शेती करण्याच्या नव-नवीन पध्दती जसे की सेंद्रिय शेती, करार शेती, सहकारी शेती यामुळे शेतकऱ्यांच्या, ग्रामीण लोकांच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा घडून येत आहे. आज शेतकऱ्याकडेही भौतीक सुविधा देणाऱ्या वस्तुंचा उपभोग वाढला आहे. शैक्षणिक, सामाजिक प्रगती होत आहे.कृषीपूरक उद्योगाच्या माध्यमातून उद्योजक होण्याची संधी ग्रामीण भागात मिळत आहे.एकंदरितच कृषी क्षेत्राने ग्रामीण जीवनामध्ये सकारात्मक बदल घडवण्यात महत्वाची भूमीका पार पाडला आहे.

सारांश रुपाने असे म्हणता येईल की आर्थिक विकास साधत असताना कृषी क्षेत्राकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. एवढेच नव्हे तर कृषी क्षेत्राच्या सहकार्याशिवाय आपणास आर्थिक विकास साध्यच करता येणे शक्य नाही. असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

## संदर्भ सूची :-


१) WTO secretariat-world trade statistical review.२०१७

२) UNCTAD.WTO

३) Ministry of statistics and Programme Implemntation, Planning Commission of India

४) Annual Reparts-२०१७-१८-Ministry of Commerce and Industry

५) Shabana Anjum and Arifa khan - Changing Pattern in Indiass Agricultural Exports under WTO-Economic Affairs vol-६२. No.०२-June २०१७

६) Apeda.Gov.in/

७) Agriculture census-Indian Experience, National sample survey office, Min. of Statistic and Progarmme Implemention Govt. of India

८) Rural Development-Sundaram I.s. Himalaya publishing House mimbai-१९९९

९) Hand Book Statistics on Indian Economy-RBI

१०) कृषी अथशास्त्र-डॉ.विजय कविमंडन,श्री मंगेश प्रकाशन नागपूर-१९९६


Scanned by CamScanner